चिपळूण नगर परिषद

## जाहीर निविदा

(अभिलेख व भांडार विभाग)

चिपळूण नगर परिषदेचे उपयोगाकरीता खालील वर्णनाच्या वस्तुंचा पुरवठा करणेसाठी दोन लखोटाा पध्दतीने सीलबंद निविदा मागविणेत येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाज पत्रकीय रक्कम | बयाणा रक्कम डीडी अथवा मुदत ठेव स्वरूपात | पुरवठादाराची पात्रता | कामाची मुदत | निविदा फॉर्मची किंमत (नापरतावा) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | (आय.एस.आय.मार्क) नामांकित कंपनीची २० इंची लेडीज सायकल, (स्टँड,बास्केट,कॅरीअर, बेल, फुल चेनकव्हर सह) १४० नग पुरविणे | ३,०८,०००/- | ५,०००/- | शॉप ॲक्ट लायसन, विक्रीकर नोंदणी दाखला व कंपनीचा अधिकृत विक्रेता असल्याबाबतचे प्रमाणपत्र व माहितीपत्र | १५ दिवस | ५००/- |
| २ | (आय.एस.आय.मार्क) नामांकित कंपनीच्या हाफ शटल व त्याच कंपनीच्या स्टँडसह ५६ शिलाई मशिन पुरविणे | १,६७,३००/- | ५,०००/- | शॉप ॲक्ट लायसन, विक्रीकर नोंदणी दाखला व कंपनीचा अधिकृत विक्रेता असल्याबाबतचे प्रमाणपत्र व माहितीपत्र | १५ दिवस | ५००/- |
| | (आय.एस.आय.मार्क) नामांकित कंपनीच्या व त्याच कंपनीच्या स्टँडसह २ पिको व फॉल मशिन पुरविणे. | | | | | |

१. निवीदा फॉर्म दिनांक २९/१२/२००८ पर्यत म्यु.पल रेकॉर्ड विभागात सायं. ५ पर्यंत मिळतील.

२. परीपूर्ण सिलबंद निविदा दिनांक ३१/१२/२००८ रोजी दुपारी २.०० पर्यत प्रशासकीय अधिकारी,चिपळूण नगर परिषद यांचे कक्षामध्ये ठेवलेल्या टेंडर पेटीमध्ये टाकावयाची आहे.

३. प्राप्त निविदा धारकांच्या निविदा शक्यतो त्याच दिवशी सायं. ४.०० वा. पर्यंत उपस्थित निविदा धारकांसमोर उघडणेत येतील.

उशीरा आलेल्या पोष्टाने/कुरीयरने आलेल्या निविदा स्विकारण्यात येणार नाहीत.
कामासंबधी माहिती नगर परिषद अभिलेख व भांडार विभागात पहावयास मिळेल. सविस्तर निविदा सुचना नगर परिषदेच्या अभिलेख व भांडार विभागात मागणी केल्यास विनामुल्य उपलब्ध आहेत. किंवा नगर परिषद नोटीस बोर्डवर पहावयास मिळेल.
कोणतेही निविदा स्विकृत अथवा अस्विकृत करण्याचे अधिकार राखून ठेवणेत येत आहेत.

निविदा सुचना क्रमांकः ०८१२५४
दिनांक : २०/१२/२००८.

टीप : सविस्तर निविदा सुचना नगर परिषदेचे **www.cmcchiplun.org** या वेबसाईटवर पहावयास मिळेल.

मुख्याधिकारी
चिपळूण नगर परिषद

सविस्तर निविदा सुचना

१. बयाणा रक्कम डी.डी. किंवा मुदत ठेव किमान ६ महिने मुदतीची स्विकारली जाईल. रोखीने स्विकारली जाणार नाही.

२. निविदा फॉर्म लेखा विभागात आवश्यकती रक्कम रोख भरल्यानंतर न.पा.च्या अभिलेख व भांडार विभागातून उपलब्ध होतील.

३. करारनामा पूर्ण झाल्यावर यशस्वी ठेकेदारांची बयाणा रक्कम सुरक्षा अनामत म्हणून वर्ग होईल.

४. निविदा स्विकृतीचे पत्र मिळाल्यापासून दिलेल्या मुदतीत करारनामा न केल्यास बयाणा रक्कम जप्त होईल. निविदा उघडल्यापासून १२० दिवसांत नगर परिषदेने काहीही न कळविल्यास निविदा धारकाला निविदा मागे घेता येईल व अशा वेळी बयाणा रक्कम परत मिळेल. निविदा दिनांकापासून १२० दिवसापर्यंत वैध राहील.

५. अयशस्वी निविदा धारकांना निविदा नामंजूर झाल्याचे कळविल्यानंतर किंवा १२० दिवसांनंतर अर्ज केल्यानंतर बयाणा रक्कम परत देण्यात येईल.

६. निविदा स्विकृतीबाबत ठेकेदार यांना पत्राने कळविण्यात येईल.

७. निविदा धारकांनी कामाची निविदेमध्ये पुरवठा करणाऱ्या वस्तुंची किंमत तसेच कंपनीचे नांव, मेक व त्यासंबधीचे माहिती पत्रक असल्यास निविदेसोबत जोडावे व किंमत अक्षरी लिहून सही करणे आवश्यक आहे. अक्षरी व आकडी यामध्ये फरक आढळल्यास दोन्हीमधील सर्वात कमी दर स्विकृत करण्यात येईल.

८. निविदा सादर करण्याची पध्दत

    १. निविदा दोन स्वतंत्र लखोट्यात सिलबंद सादर करणे आवश्यक आहे.

    २. निविदा लखोटा एक मध्ये कागदपत्रांची यादी व सर्व कागदपत्र सत्यप्रती लिपी करणे आवश्यक आहे.

    ३. भागीदारी फर्म असल्यास भागीदारी पत्राची सत्यप्रती लिपी व अधिकार पत्र जोडणे आवश्यक आहे.

    ४. दोन्ही लखोट्यावर कामाचे नाव ठेकेदाराचे नांव लिहून दोन्ही लखोटे सिलबंद करून लखोटा क्रमांक ३ मध्ये सिलबंद करुन सादर करणे आवश्यक आहे.

    ५. निविदेमध्ये दर टाकलेल्या कंपनीचे अधिकृत विक्रेते अथवा अधिकृत पुरवठादार किंवा उत्पादक असल्याबाबत आवश्यकतो कंपनीचा दाखला सत्यप्रती लिपी असणे आवश्यक आहे.

    ६. लखोटा क्रमांक १ मध्ये विशिष्ठ मालाचा पुरवठा करणेसाठी शासनाचे् परवाना आवश्यक असल्यास त्याची सत्यप्रतिलिपी असणे आवश्यक आहे.

९. निवदा उघडणे

    ९.१ निविदा उघडणेसाठी नेमलेल्या दिवशी प्रथम लखोटा क्रमांक १ उपस्थित ठेकेदारासमोर उघडणेत येईल. व त्यामध्ये कागदपत्रांची छाननी मुख्याधिकारी किंवा मुख्याधिकारी यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी करतील. व उपस्थित ठेकेदार यांचे आक्षेप यासंबधी खात्री करतील.

    ९.२ दुसरे दराचा सिलबंद लखोटा लखोटा क्रमांक १ मधील कागदपत्रे योग्य असल्याबद्दल मुख्याधिकारी अथवा मुख्याधिकारी यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी यांची खात्री पटल्यानंतरच उघडण्यात येईल.

    ९.३ निविदा लखोटा क्रमांक १ मधील कागदपत्रे अपूर्ण अथवा अयोग्य असल्यास लखोटा क्रमांक २ उघडण्यात येणार नाही. व तो निविदा धारकांला परत मिळणार नाही.

    ९.४ निविदेसंबधी कोणतेही मुद्दे उपस्थित करावयाचे असल्यास ते निविदेसोबत लखोटा क्रमांक १ मध्ये देणे आवश्यक आहे. मुख्याधिकारी यांचेवर कोणत्याही अटीची निविदा किंवा बेकायदेशिर अटी स्विकृत करण्याचे बंधन नाही.

१०. यशस्वी निविदा धारकांना निविदा मंजूरीनंतर योग्य रक्कमेच्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करून देणे आवश्यक आहे.

११. मंजूर निविदाधारकांना करारनामा आदेश दिल्यापासून दिलेल्या मुदतीमध्ये करारनामा न केल्यास निविदा अमान्य करून फेर निविदा अथवा अन्य निविदाधारकांची निविदा स्विकृत करावी लागल्यास फरकाची रक्कम संबधीत ठेकेदाराकडून महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १५१ अन्वये वसुल पात्र असेल.

१२. कोणतेही अथवा सर्व निविदा स्विकृत अथवा अस्विकृत करण्याचा अधिकार खालील सही करणार यांनी राखून ठेवला आहे. त्याबाबत कोणतेही कारणे देण्यात येणार नाहीत.

मुख्याधिकारी
चिपळूण नगर परिषद